दुग्धव्यवसाय विकास विभागांतर्गंत बंद पडलेल्या व बंद पडण्याची शक्यता असलेल्या शासकीय दूध योजना व शितकरण केंद्रे खाजगी-सार्वजनिक सहभाग (PPP) तत्वावर पुर्नजिवित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः पदुम १३१७/ प्र.क्र.१२६ /पदुम-९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मंबई-४०० ०३२.
दिनांक: ०२ एप्रिल ,२०१८.

वाचा :-

शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र.पदुम-२०१७/प्र.क्र.१२६/पदुम-९, दि.२८/११/२०१७.

प्रस्तावना :-

दुग्धव्यवसाय विभगातंर्गत बंद पडलेल्या व बंद पडण्याची शक्यता असलेल्या दूध योजनांचे पीपीपी तत्त्वावर (Public Private Partnership) पुनरुज्जीवन करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७/०९/२०१४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या प्रक्रियेव्दारे तज्ञ सल्लागाराची नियुक्ती करण्यास दि.२८/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. PPP २०१४/C.R.१९/SP, दि.१७ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयाची मुदत संपूष्टात आल्यानंतर पीपीपी प्रक्रियेव्दारे तांत्रिक सल्लागाराच्या नियुक्तीस पुढील मुदतवाढ दिल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे दि.१७ सप्टेंबर २०१४ च्या शासन निर्णयान्वये तांत्रिक सल्लागाराऐवजी ई-निविदा प्रक्रियेव्दारे तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्याचे शासनाच्या विचाराधिन होते.

शासन निर्णय:-

दुग्धव्यवसाय विकास विभागांतर्गत बंद पडलेल्या व बंद पडण्याची शक्यता असलेल्या शासकीय दूध योजना व शितकरण केंद्रे खाजगी सार्वजनीक सहभाग (पी.पी.पी.) तत्वावर पुनरुज्जीवीत करण्यास व विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन अहवाल सादर करण्यासाठी तांत्रिक सल्लागाराची ई-निविदा प्रक्रियेव्दारे नियुक्ती करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०५०२१७२५०९२००१** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran V Kurundkar

Digitally signed by Kiran V Kurundkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f89b7a82db2238fb7337a9a9b8e00b9c1a35b509d1f6850ddcc783bdb12090f, cn=Kiran V Kurundkar
Date: 2018.05.02 17:28:50 +05'30'

(किरण कुरुंदकर)

सचिव (पदुम) महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्य सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. प्रधान सचिव (वित्त विभाग).
४. प्रधान सचिव (नियोजन विभाग).
५. प्रधान सचिव (महसूल व वन विभाग).
६. प्रधान सचिव (सामान्य प्रशासन विभाग).
७. आयुक्त,दुग्धव्यवसाय विकास विभाग,मुंबई.
८. महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ मुंबई.
९. मा.मंत्री (पदुम), यांचे खाजगी सचिव .
१०. मा.राज्यमंत्री (पदुम), यांचे खाजगी सचिव.
११. निवडनस्ती.